# निसर्ग

खूप खूप बरसल्यावर
रिता झाला पाऊस
आज तरी भागली असेल का,
एखाद्या दिलाची हौस?

बरसण्याचे काम
जोखमीचेच असते
किती पडायचे, कधी थांबायचे..
गणित अवघड असते!

बऱ्याच आधीपासून ढगांचा
घ्यावा लागतो आढावा
त्यांच्याच मर्जीवर तर विसंबून,
पाऊस किती पाडावा...

कधी कधी बरसायची
जागा असते ठरलेली,
पण वाऱ्याच्या नादाने ढगांची स्वारी
भलतीकडेच फिरलेली!

राहून जाते अशात मग
नवप्रेमींना भिजवणे
आणि रूसून बसते भुई
काढत अधिक-उणे

शेतकऱ्यांचे खावे लागतात
किती शिव्या-शाप...
कळतो का हो कोणाला
पावसाच्या डोक्याचा ताप?

निसर्गाच्या हातातली
आम्ही सारी प्यादी
त्यानेच पास करावी लागते
आमची कामाची यादी!

दिल का राजा मन की खुशी
अशी त्याची तऱ्हा
ढग, वारा, पाऊस झूठ
निसर्गच आहे खरा!


**©प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com